# पवना सहकारी बँक लि., चिंचवड, पुणे - ४११ ०१९

मुख्यकार्यालय- एच ब्लॉक,प्लॉट नं.सी-२०,पिंपरी औद्योगीक वसाहत
ॲटो क्लस्टर जवळ, चिंचवड,पुणे-१९.फोन क्रं-९८२२८३८२३५

| मिळकतदार यांचे नाव/कर्जदार जामिनदार | जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचे वर्णन | वाजवी मुल्यांकन | लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| <u>जामिनदार</u><br>श्री. रावसाहेब आण्णाप्पा रास्ते , रा. बिल्डींग नं६/१ रामनगर हौ.कॉम्पलेक्स गव्हाणे वस्ती, भोसरी ,पुणे-३९<br>ता- हवेली, जि-पुणे. | मौजे नांगोळे, ता- कवठेमहांकाळ, जि-सांगली येथील गट क्रं १४१ मधील क्षेत्र हे.३११.०० आर पैकी त्यांच्या हिस्स्याचे क्षेत्र ३३.३३आर | १४,९९,८००/- (चौदा लाख नव्यानऊ हजार आठशे रूपये फक्त) | वार - मंगळवार,<br>दि. १०/११/२०२०<br>वेळ - सकाळी ११.३० |

जाहीर लिलावाचे स्थळ :- नांगोळे तलाठी कार्यालयासमोर, गाव-नांगोळे,ता-कवठेमहांकाळ,जि.सांगली.

## <u>स्थावर मालमत्ता लिलावाच्या अटी व शर्थी</u>

लिलावात भाग घेण्यासाठी रुपये १५,०००/- अनामत ठेवावी लागेल.

१) बोलीमध्ये किमान फरक किती असेल हे लिलाव सुरु होणेपूर्वीच विशेष वसुली अधिकारी ठरवतील.

२) सरकारी वाजवी किंमतीपेक्षा कमी किंमत लिलावात कायम करता येणार नाही.

३) सदर लिलाव हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदींनुसार केला जाईल.

४) सर्वांत जास्त बोली देणाऱ्याचे नावे लिलाव पुकारण्यात येईल.

५) खरेदीदाराने (लिलाव घेणाऱ्याने) रजिस्ट्रेशन करून घेण्यासाठी लागणारा खरेदी खर्च करावयाचा आहे.

६) ज्याचे नावे लिलाव पुकारण्यात येईल व जो लिलावात सर्वांत जास्त किंमत देईल त्याने खरेदीच्या १५% रक्कम पवना सहकारी बँक लि या नावाने डी.डी/आर.टी.जी.एस/ रोख स्वरूपात रक्कम ताबडतोब अनामत भरणा केली पाहिजे.

७) उर्वरित राहिलेली ८५% रक्कम व मुद्रांकाकरिता(रजिस्ट्रेशनसाठी ) लागणारी रक्कम ३० दिवसाचे आत बँकेकडे भरली पाहिजे.

पवना सहकारी बँक लिमिटेड
नों. क्रं.
पी.एन.ए./बी.एन.के./२१६,
दि.
१२/०७/१९७३
विशेष वसुली अधिकारी

८) खरेदीदाराने(लिलाव घेणाऱ्याने) मुदतीत रक्कम न भरल्यास भरणा केलेल्या अनामत रकमेतून खर्च वसुल करून राहिलेली रक्कम जप्त करण्यात येईल.खरेदीदारास विक्री करण्याच्या मालमत्तेवर किंवा अनामतीवर हक्क सांगता येणार नाही.

९) लिलाव घेणाऱ्याने कसूर केल्याने फेर लिलाव करण्याची पाळी आल्यास त्यासाठी होणारा खर्च व किंमतीत कमी रक्कम आल्यास तूट कसूर करणाऱ्याकडून वसूल केली जाईल.

१०) लिलावात मान्यता प्राप्त सहकारी खात्याच्या जिल्हा उपनिबंधक अथवा त्यांनी निर्द्रिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडील मंजुरी मिळाल्यावर लिलाव कायम करण्यात येईल.

११) लिलावात कायदेशीर अडचणी उद्भावल्यास अगर मुळ कर्जदार/ जामिनदारांनी कर्जाची रक्कम लिलाव सुरु होण्यापूर्वी भरणा केल्यास सदर लिलाव तहकूब अगर रद्द केला जाईल. लिलावात सर्वांत जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीला लिलाव देता येत असला तरी सदर लिलावात काही संशयास्पद बाबी निदर्शनास आल्यास सदर लिलाव विशेष वसुली अधिकारी हे तहकूब करु शकतील.

१२) लिलावासंबंधी सर्व अधिकार विशेष वसुली अधिकारी यांनी स्वतःकडे राखुन ठेवले असून ते परिस्थितीनुरुप योग्य तो निर्णय घेतील.

१३) सदर मिळकतींचे शासकीय,महानगरपालिका,वीजमंडळ व इतर संस्थांना देय असलेली सर्व देणी लिलाव घेणाऱ्याने भरणे बंधनकारक राहील.

१४) वरील अटींव्यतिरिक्त लिलावाच्या वेळी विशेष वसुली अधिकारी हे ऐनवेळी ज्या नवीन अटी व शर्ती घालतील अगर कमी करतील किंवा त्यात बदल करतील त्या बोली बोलणाऱ्यावर बंधनकारक राहतील.

१५) कोणतेही कारण न देता लिलाव रद्द वा तहकुब करण्याचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

१६) लिलावात मान्यताप्राप्त सहकारखात्याच्या जिल्हा उपनिबंधक अथवा त्यांनी निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडुन मंजुरी मिळण्याच्या आत किंवा लिलाव तारखेपासुन ३० दिवसांच्या आत कर्जदार यांनी कर्जाची संपुर्ण परतफेड केली असता सदरचा लिलाव रद्द करण्याचा अधिकार विशेष वसुली अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

पवना सहकारी बँक लिमिटेड नो. क्रं. पी.एन.ए./बी.एन.के./२१६, दि. १२/०७/१९७३ विशेष वसुली अधिकारी

**विशेष वसुली अधिकारी / विक्री अधिकारी**
**पवना सहकारी बँक लि.,चिंचवड,पुणे-१९**